मफुकृवि ई वार्ता
मे
२०२२

वर्ष :२, अंक क्रं. : १७, मे, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## पुणे येथे गोधन–२०२२ चे यशस्वी आयोजन : उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. अजित पवार यांच्या शुभहस्ते उद्‌घाटन







**दि. २७ ते २९ मे, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि सकाळ अँग्रोवन यांच्या संयुक्त उपक्रमातून कृषि महाविद्यालय, पुणे येथे आयोजित केलेल्या गोधन २०२२ या पशुप्रदर्शनाचे उद्घाटन मा. ना. श्री अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले की शेतीचा इतिहास पाहिला तर शेती विकासामध्ये पशुधनाचे खूप महत्व आहे. भारतातील शेतकरी समृध्द होण्यामध्ये गोधनाचे मोठे योगदान आहे. नामशेष होत असलेली देशी गोवंशाच्या प्रजातींचे संवर्धन करणे गरजेचे आहे. त्यामुळे पुढील पिढीस शेतीबरोबरच पशुधनाचेही महत्व समजले जाईल. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने कार्यान्वित केलेले देशी गोवंश संशोधन व प्रशिक्षण केंद्र शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरेल. या केंद्रामुळे देशी गोवंशाच्या विविध प्रजाती एकाच ठिकाणी पाहण्यास मिळणार आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी पाटील यांनी सांगितले की देशी गाईच्या संशोधन व संवर्धनाबरोबर गोपरिक्रमासारखे उपक्रम सकारात्मक उर्जा निर्माण करण्यासाठी महत्वाचे आहेत. देशी गायी, शेती आणि आरोग्य यांची सांगड घालूनच भारतीय संस्कृती निर्माण झाली आहे. या प्रसंगी विधानपरिषद सदस्य तथा, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे कार्यकारी परिषद सदस्य आ. श्री. नरेंद्र दराडे, श्री. दत्तात्रय पानसरे, श्री. दत्तात्रय उगले, दापोली येथील डॉ. बा.सां.को.कृ. विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. शंकरराव मगर, पुणेचे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता(कृषि),डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद

वर्ष :२, अंक क्रं. : १७, मे, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





लहाळे, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासळकर उपस्थित होते. प्रदर्शनस्थळी डॉ. सोमनाथ माने यांनी देशी गोवंशाची माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री आदिनाथ चव्हाण, संपादक अँग्रोवन सकाळ यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. धीरज कणखरे, प्राध्यापक, पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, पुणे यांनी केले आणि विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य, श्री. दत्तात्रय पानसरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## पशुसंवर्धन मंत्री मा. ना.श्री. सुनील केदार यांची गोधन-२०२२ ला भेट





**दि. २८ मे, २०२२.** गोधन २०२२ देशी गोवंश प्रदर्शनास मा. ना.श्री.सुनील केदार,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी भेट दिली. भेटी दरम्यान त्यांनी प्रदर्शन स्थळावरील बायोगॅस संयंत्र, सौर उर्जा प्रकल्प, देशी गायींच्या विविध जातींचे स्टॉल, शेणापासून रोपे लावण्याच्या कुंड्या, मूर्ती, मोबाईल स्टॅन्ड, पणत्या इ. मूल्यवर्धित वस्तू व इतर गौ उत्पादनांचे स्टॉल, शेण-गोमूत्रापासून जैव मिश्रण, पशु संशोधन प्रयोगशाळा, प्रकल्पाचा सेल्फी पॉईंट, मुधोळ हाऊंड, कुक्कुटपालन व गो-परिक्रमा उपक्रमास भेट देऊन इत्यंभूत माहिती घेतली. त्यांनी शेणापासून मूल्यवर्धित वस्तू तयार करणाच्या संकल्पनेचे विशेष कौतुक केले. देशी गोवंश केंद्राचे काम उत्कृष्ट असल्याचा निर्वाळा देत संशोधनावर भर देण्याविषयी त्यांनी सूचित केले. या वेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त श्री. सचिंद्र प्रताप सिंह, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. धनंजय परकाळे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. शितलकुमार मुकणे, कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड, पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. धीरज कणखरे व देशी गोवंश संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने उपस्थित होते.

वर्ष :२, अंक क्रं. : १७, मे, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## गोधन-२०२२ प्रदर्शनाचा समारोप






**दि. २९ मे, २०२२.** देशाची आणि शेतीची प्रगती होत असताना दुसऱ्या बाजूला माती, पाणी आणि मानवी आरोग्यामध्ये प्रदूषण वाढले आहे. हे जर बदलायचे असेल तर जमीन सुपीकता आणि त्यासाठी देशी गोपालनाची जोड देण्याचे आवश्यकता आहे असे प्रतिपादन कोल्हापुरातील कणेरी येथील सिध्दगिरी मठाचे श्री. काडसिध्देश्वर स्वामी यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि सकाळ-ॲग्रोवन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे कृषि महाविद्यालयातील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रामध्ये आयोजीत केलेल्या गोधन प्रदर्शनाचा समारोपप्रसंगी श्री. काडसिध्देश्वर स्वामी बोलत होते. या प्रदर्शनाचे सहप्रायोजक कन्हैया ॲगो, चितळे डेअरी व बारामती ॲग्रो आहे. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासळकर, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख डॉ. सोमनाथ माने, डॉ. धीरज कणखरे उपस्थित होते. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले की जमीन सुपीकतेसाठी सर्वांनी काम करण्याची गरज आहे. त्यासाठी विद्यापीठ सर्व दृष्टीने मार्गदर्शनाचे काम करत आहे. एकात्मिक शेती पध्दती हीच आता उपयुक्त ठरणार आहे. त्यादृष्टीने शेतीला पूरक उद्योगाची जोड त्याबरोबरीने पीक विविधतेवर लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी शास्त्रीय पध्दतीने शेती, पशुपालनाचे नियोजन करावे लागेल. दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत यांनी भेट दिली. याप्रसंगी प्रदर्शनातील देशी गाईच्या विविध जाती, दूध प्रक्रिया, बायोगॅस, शेण व गोमूत्रापासून बनविलेल्या खतनिर्मिती प्रक्रिया प्रकल्पाची माहिती घेतली. कार्यक्रमात डॉ. धीरज कणखरे यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. सुनिल अडांगळे यांनी आभार मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात ६२ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**दि. १ मे, २०२२.** संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून १०७ हुतात्म्यांच्या बलिदानामुळे १ मे, १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. क्रांतीसिंह नाना पाटील, श्री. डांगे, शाहिर अण्णाभाऊ साठे, शाहिर अमर शेख यांनी आपल्या शाहिरीने त्या काळी संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांच्या मनात स्वाभीमानाचे स्फुलींग पेटविले त्या सर्वांची आठवण आपण सर्वांनी जागविली पाहिजे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या जडणघडणीत खऱ्या अर्थाने आपले बहुमुल्य असे योगदान दिले. महाराष्ट्राने आतापर्यंत औद्योगीक, शैक्षणिक आणि कृषि क्षेत्रात केलेल्या सर्वांगीन विकासामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीत महत्वाची भुमिका बजावली आहे. देशाच्या विकासात कामगारांचाही सहभाग फार मोठा आहे म्हणुन आजचा दिवस कामगार दिवस म्हणुनही साजरा केला जातो. महात्मा फुले कृषि विद्यापीठ शेतकऱ्यांसाठी सदैव कार्यरत आहे. महाराष्ट्र दिनाच्या प्रसंगी आपण जबाबदारीने तसेच चांगले काम करुन



विद्यापीठाचे तसेच महाराष्ट्राचे नांव जगभर करु या असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ६२ वा महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलींद ढोके, हाळगांव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते. या प्रसंगी विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्षनाथ शेटे व एन.सी.सी. अधिकारी डॉ. सुनिल फुलसावंगे यांनी केले.

## अभिनंदन

### महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा कास्ट प्रकल्प देशात अव्वल




**दि. ५ मे, २०२२.** जागतिक बँक अर्थसहाय्यित, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प, नवी दिल्ली अंतर्गत महात्मा फुले कृषि विद्यपीठ, राहुरी येथे असलेल्या हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक

मफुकृवि ई वार्ता
मे २०२२

कृषि विज्ञान व तंत्रज्ञानाची (कास्ट) वार्षिक आढावा बैठक नवी दिल्ली येथे पार पडली. हा प्रकल्प देशभरात १४ राज्यांमध्ये राबविला जात आहे. प्रकल्प अहवालचे सादरीकरण या प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले. या वार्षिक आढावा बैठकीला उपमहासंचालक (शिक्षण) डॉ. आर.सी. अग्रवाल, नाहेप प्रकल्पाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. पी. रामासुंदरम, परिक्षण व मुल्यमापन आणि पर्यावरण शाश्वतीचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. हेमा त्रिपाठी, नाहेपचे संचालक डॉ. कुमार राजेश, जागतिक बँकेचा चमु, देशातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरु ऑनलाईन उपस्थित होते.

**महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा कास्ट प्रकल्प हा शिक्षण, संशोधन, विस्तार, वित्त व्यवस्थापनात सरस ठरुन देशात प्रथम क्रमांक आलेला आहे. या प्रकल्पातंर्गत कोव्हिड-१९ च्या लॉकडाऊन काळामध्ये १८४ ऑनलाईन सत्र घेण्यात आले आहे. या प्रकल्पाद्वारे फळबागांच्या फवारणीसाठी रोबोट विकसीत केलेला आहे. या प्रकल्पाद्वारे ड्रोन तंत्रज्ञान, डिजिटल शेती आणि स्मार्ट व्हिलेज हि संकल्पना प्रत्यक्षात अमलात येत आहे. कास्ट प्रकल्पाच्या टिमच्या अविरत परिश्रमामुळे या प्रकल्पाला देशात प्रथम क्रमांक मिळाला आहे.**

**- कुलगुरु डॉ. पी.जी.पाटील**

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कास्ट प्रकल्पातंर्गत कोव्हिड-१९ परिस्थितीत पाच आंतरराष्ट्रीय कार्यशाळा, ४६ राष्ट्रीय प्रशिक्षणे, २७ राष्ट्रीय कार्यशाळा, १९ वेबिनार्स, ७३ तंज्ञ व्याख्याने, १४ प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने अभ्यासक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये २५५३६ शिक्षक/शास्त्रज्ञ आणि २९४३५ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. हवामान अद्ययावत शेती आणि डिजिटल तंत्रज्ञान या विषयांवरील व्याख्याने व प्रशिक्षणाचा ६१६८ शेतकर्यांना लाभ झाला आहे. या कास्ट प्रकल्पातंर्गत शेतीमध्ये ड्रोन तंत्रज्ञान आणि रोबोटचा वापर यावर मोठे काम केले आहे. या प्रकल्पाने फळबागांच्या फवारणीसाठी विकसीत केलेल्या रोबोटला आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरविण्यात आले आहे.

या बैठकीमध्ये नवी दिल्ली येथील कृषि व शेतकरी कल्याण विभागांतर्गत आझादी का अमृत महोत्सव या सदराखाली किसान ड्रोनला प्रोत्साहन देणे: समस्या, आवाहने आणि पुढील मार्ग या विषयांवार एक दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी केंद्रीय कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्री ना. श्री. नरेंद्रसिंह तोमर, केंद्रिय कृषि आणि शेतकरी कल्याण राज्य मंत्री ना.श्री. कैलास चौधरी, कृषि सचिव श्री. मनोज आहुजा, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. त्रिलोचन महापात्रा, सह.सचिव श्रीमती शोमिता बिस्वास उपस्थित होते. यावेळी कास्ट प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी कृषि क्षेत्रात ड्रोनचा वापर: संधी आणि आवाहने या विषयावर सादरीकरण केले. केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण विभागातंर्गत भुमापन आणि पीक अन्नद्रव्य मुल्याकंनाकरीता ड्रोन तंत्रज्ञानाच्या वापरासाठी स्टॅन्डर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर (एसओपी) बनविण्याच्या समितीचे सदस्य म्हणुन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कास्ट प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. गोरंटीवार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. कृषि विद्यापीठाचा कास्ट प्रकल्प देशात प्रथम आल्याने विद्यापीठाच्या सर्व स्तरातुन प्रकल्पाचे अभिनंदन होत आहे. या प्रकल्पाच्या यशामध्ये कुलगुरु डॉ. पी.जी.पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संचालक संशोधन व विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

मफुकृवि ई वार्ता
मे २०२२



## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बीजोत्पादन प्रकल्पास देशात प्रथम क्रमांक




**दि. १२ मे, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील बीजोत्पादन प्रकल्पाला माउ, उत्तर प्रदेश येथील भारतीय बीज अनुसंधान संस्था येथे झालेल्या ३७ वी वार्षिक बीजोत्पादन आढावा बैठकीत देशात प्रथम मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. या बैठकीसाठी नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे बियाणे विभागाचे सहायक निदेशक डॉ. डि.के. यादव, उत्तर प्रदेश येथील भारतीय बीज अनुसंधान संस्थेचे संचालक डॉ. संजय कुमार व भारत सरकारच्या बियाणे विभागाचे सचिव श्री. अश्विन कुमार उपस्थित होते. संपूर्ण देशात एकूण ६५ गुणवत्तापूर्ण बीजोत्पादन प्रकल्प कार्यरत आहेत. या प्रकल्पांमधून महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बीजोत्पादन प्रकल्पास प्रथम क्रमांक मिळाला आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील बीजोत्पादन प्रकल्पाद्वारे तयार होणारे फुले बियाणे हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर शेजारच्या राज्यातील शेतकऱ्यांच्या व बिजोत्पादन कंपन्यांच्या पसंतीस उतरलेले असून कांदा फुले समर्थ बियाण्यास संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात मागणी असते. याचप्रमाणे विद्यापीठाने विकसित केलेल्या सोयाबीन पिकाचे फुले संगम व फुले किमया या वानांच्या बियाण्यासाठी शेतकऱ्यांची पहिली पसंती असते. विद्यापीठांमध्ये २७ पिकांच्या वानांचे मूलभूत व पायाभूत बीजोत्पादन करून सदर बियाणे हे बियाणे महामंडळ, नॅशनल सीड कार्पोरेशन, विविध शेतकरी व बियाणे उत्पादक कंपन्या तसेच शेतकरी गट यांना वेळेवर उपलब्ध करून दिले जाते. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांचे मार्गदर्शनाखाली कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके, डॉ. चंद्रकांत साळुंखे, डॉ. कैलास गागरे, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बीजोत्पादन कार्यक्रमात सहभागी असणारे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच बियाणे विभागाच्या अंतर्गत कार्यरत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी परिश्रमपूर्वक बीजोत्पादनाचे काम करत असतात. या सर्वांच्या परिश्रमामुळेच महात्मा फुले कृषि विद्यापीठास हा सन्मान प्राप्त झाला आहे.

## राहुरी कृषी विद्यापीठातील मृदा शास्त्रज्ञ प्रा. संजय तोडमल सुवर्ण पदकाने सन्मानित



**दि. ५ मे, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील संशोधन संचालनालयात कार्यरत असलेले मृदा शास्त्रज्ञ प्रा. संजय तोडमल यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या २४ व्या पदवीदान समारंभात सुवर्ण पदक देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. संजय तोडमल यांनी मराठवाडा कृषी विद्यापीठात आचार्य पदवीसाठी प्रबंध सादर केला होता. खोल जमिनीत हळुवारपणे व नियंत्रितपणे उपलब्ध होणाऱ्या खतांना सोयाबीन पिकाचा प्रतीसाद या महत्त्वपूर्ण

संशोधनासाठी प्रति कुलपती मा. ना. श्री. दादाजी भुसे यांच्या हस्ते प्रा. संजय तोडमल यांना आचार्य पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलपती तथा मा. राज्यपाल श्री.भगतसिंह कोश्यारी हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक ढवण, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील उपस्थित होते. यावेळी प्रा. संजय तोडमल यांना मृद विज्ञान व कृषी रसायनशास्त्र या विषयात आचार्य पदवी घेताना संपूर्ण विद्यापीठात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल सुवर्णपदक स्वर्गीय गंगाराम भागवतराव रुद्राक्ष हा पुरस्कार व रोख रक्कमेचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

## नमामि गंगे या प्रकल्पासाठी आयआयटी, कानपूर सोबत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा लवकरच सामंजस्य करार






**दि. ६ मे, २०२२.** भारत सरकारने गंगा नदीच्या शुद्धीकरणासाठी नमामि गंगे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पासाठी भरीव तांत्रिक योगदान देण्याच्या दृष्टीने महात्मा फुले कृषि विद्यापीठ सदैव तयार आहे. या प्रकल्पासाठी आयआयटी, कानपूर सोबत संपूर्ण देशातून राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाची निवड ही निश्चितच भूषणावह बाबआहे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी केले. लवकरच महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व आयआयटी, कानपूर यांच्यामध्ये याबाबतचा सामंजस्य करार होणार आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरुन मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. पाटील बोलत होते. यावेळी आयआयटी कानपूरचे प्राध्यापक विनोद तारे, इंजि. राकेश मिश्रा, पुणे येथील हिंदुस्तान ॲग्री बिझनेस लिमिटेडचे प्रमुख श्री. गणेश कुलकर्णी, डेरे ॲग्रो इंडियाचे संचालक इंजि. संदिप डेरे, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील गोरटीवार, सह प्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे आणि विभाग प्रमुख उपस्थित होते. प्रा. विनोद तारे यावेळी म्हणाले की नमामि गंगे प्रकल्पासाठी कृषि विषयक जे जागतिक तंत्रज्ञान चांगले आहे ते भारतात आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. जपानमधील मातीविरहित मेम्ब्रेन तंत्रज्ञान भारतात आणून ते आपल्यासाठी कसे फायदेशीर ठरेल हे पाहणे गरजेचे आहे. नमामि गंगे या प्रकल्पाविषयी मार्गदर्शन करताना ते पुढे म्हणाले की, भारतीय पर्यावरण, हवामान याविषयी मानवी वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी हा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यावेळी श्री. गणेश कुलकर्णी यांनी मेम्ब्रेन तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली. डॉ. सुनील गोरंटीवार यांनी कास्ट प्रकल्पाने आतापर्यंत केलेल्या विविध हवामान तसेच जल व्यवस्थापनाच्या तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली. यावेळी कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांच्या हस्ते कास्ट प्रकल्पाचा देशात प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. सुनील गोरटीवार यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. मुकुंद शिंदे यांनी तर आभार डॉ. पवन कुलवाल यांनी मानले.

मफुकृवि ई वार्ता
मे २०२२

## श्री. दिलीप देशमुख व श्री. बाबासाहेब सपकाळ हे आहेत मे महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ मे, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील शेतकरी व महात्मा फुले कृषि विद्यापीठात पदवी घेतलेले यशस्वी कृषि उद्योजक यांचा परिचय समस्त शेतकरी वर्गाला आणि विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने कुलगुरु डॉ. पाटील यांनी नवीन संकल्पना राबविली आहे. मे २०२२ या महिन्याकरिता शेतकरी आयडॉल म्हणून मानोरी, ता. राहुरी, जिल्हा अहमदनगर येथील श्री. बाबासाहेब सपकाळ व कृषि उद्योजक म्हणून धुळे कृषि महाविद्यालयातून बीएससी कृषिचे शिक्षण घेतलेले पाचोरा जि. जळगाव येथील श्री. दिलीप देशमुख यांचा समावेश आहे. श्री. बाबासाहेब सपकाळ यांनी सुरुवातीला शेतमजूर म्हणून काम केले. परंतु, नंतर गोपालक म्हणून नाव मिळविले. त्यांनी त्यांच्या एक एकर क्षेत्रापैकी २० गुंठ्यामध्ये मुक्त गोठा उभारून २६ संकरित गाईंपासून प्रति दिन ४०० लिटर पर्यंत संपूर्ण वर्षभर दुधाचे उत्पादन घेण्याचे नियोजन केले आहे. त्यांनी मुक्त गोठ्यात उन्हाळ्यामध्ये तापमान नियंत्रणासाठी तुषार सिंचन पद्धतीचा यशस्वीपणे वापर केलेला आहे तसेच गाईंचे दूध काढण्यासाठी दूध काढणी यंत्राचाही वापर ते करतात. मुरघास तंत्रज्ञानाचा अवलंब करून जनावरांसाठी लागणारा चारा विकत घेऊन त्यापासून कुट्टी करून खड्डा पद्धतीने साठवणूक करून वर्षभर लागणाऱ्या हिरव्या चाऱ्याचे व्यवस्थापन अत्यंत चोखपणे त्यांनी केले आहे. श्री. सपकाळ यांना या सर्व कामांसाठी कुटुंबातील व्यक्तींचा सहयोग मिळाला असून या कामासाठी त्यांनी कोणतेही मजूर लावलेले नाहीत हे विशेष. कृषि उद्योजक असलेले श्री. दिलीप देशमुख हे निर्मल सीड्स प्रा. लि. पाचोरा, जि. जळगावचे संचालक म्हणून काम पाहतात. त्यांनी या कंपनीच्या माध्यमातून एकूण ३५ वेगवेगळ्या पिकांमध्ये आतापर्यंत चारशे वाण प्रसारित केले आहेत. सध्या बाजारात जवळपास या कंपनीचे १७५ वाण विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या कंपनीच्या माध्यमातून त्यांनी पन्नास हजार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून आपले तंत्रज्ञानाचे जाळे विकसित केले आहे. या कंपनीमध्ये ६१८ अधिकारी व कर्मचारी काम करत असून त्यांनी रोजगार निर्मितीतही उल्लेखनीय काम केले आहे.

मफुकृवि ई वार्ता
मे २०२२

## सांगली जिल्ह्यात भोसे येथे सोयाबीन उत्पादकता व मुल्य साखळी प्रशिक्षण संपन्न




**दि. २३ मे, २०२२.** सांगली जिल्ह्यातील भोसे, ता. मिरज येथे महाराष्ट्र शासन, कृषि विभाग व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन व इतर गळीत धान्य उत्पादकता वाढ व मुल्य साखळी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते झाले. कुलगुरु डॉ. पाटील आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की विद्यापीठाच्या कसबे डिग्रज कृषि संशोधन केंद्राने सोयाबीनचे उन्नत वाणांची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी या वाणांचा व तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. यावेळी मिरज तालुका कृषि अधिकारी प्रदिप कदम, सांगलीच्या उपसंचालक श्रीमती प्रियंका भोसले, उपविभागीय कृषि अधिकारी प्रकाश सुर्यवंशी, डॉ. मिलिंद देशमुख, डॉ. सचिन महाजन, डॉ. संग्राम काळे व सरपंच विकास चौगुले उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन व भुईमूग पीक उत्पादन वाढ याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. मिलिंद देशमुख यांनी सोयाबीन व भूईमुग पीक उत्पादन वाढीच्या विविध सूत्रांबाबत मार्गदर्शन केले. डॉ. सचिन महाजन यांनी सोयाबीन व भूईमुग पिकावरील विविध किडी व रोग तसेच सोयाबीन बिजप्रक्रिया यावर मार्गदर्शन केले. डॉ. संग्राम काळे यांनी सोयाबीन व भूईमुग पिकाचे एकात्मिक अन्नदव्य व्यवस्थापन याबाबत माहिती दिली. श्रीमती प्रियंका भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रकाश सुर्यवंशी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी सर्व मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक, महिला वर्ग व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे गरीब कल्याण संमेलन शत प्रतिशत सशक्तिकरण निमित्ताने शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न

**दि. ३१ मे, २०२२.** अटारी, पुणे, झोन– ८, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि कृषि महाविद्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत गरीब कल्याण संमेलन शत प्रतिशत सशक्तिकरण निमित्ताने वेब संवाद आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. सुभाष भामरे, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री, भारत सरकार तथा खासदार, धुळे लोकसभा मतदार संघ हे होते तर अध्यक्षस्थानी. कृषि महाविद्यालय, धुळेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर हे होते तसेच व्यासपीठावर विभागीय कृषि विस्तार केंद्र, धुळेचे कृषि विद्या वेत्ता डॉ. मुरलीधर महाजन, कृषि तंत्र विद्यालय, धुळेचे प्राचार्य डॉ. राहुल देसले, उद्यानविद्या वेत्ता प्रा. श्रीधर देसले, डॉ. पंकज पाटील उपस्थित होते.






या मेळाव्याचे प्रास्ताविक डॉ. पंकज पाटील यांनी केले. डॉ. सुभाष भामरे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी शेतकरी सन्मान निधी तसेच पंतप्रधान आवास योजना या योजनांद्वारे शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी व उत्थानासाठी कार्य केले आहे. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या कच्च्या मालापासून टिकाऊ उत्पादने तयार करण्यासाठी प्रक्रियायुक्त पदार्थ करण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देण्यासाठी विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत. राष्ट्रीयता स्तरावर मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी आभासी पटलाद्वारे गरीब कल्याण संमेलन शत प्रतिशत सशक्तिकरण या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. त्यांनी शेतकऱ्यांना कृषि विषयक तसेच इतर दैनंदिन योजनांविषयी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. चिंतामणी देवकर यांनी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती सोबतच विषमुक्त शेतीच्या दृष्टीने वाटचाल करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी उत्पन्न दुप्पट करण्याकरिता कृषि व कृषि पूरक प्रक्रिया उद्योगाकडे वाटचाल करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कृषि भुषण पुरस्कार २०१९ प्राप्त शेतकरी डॉ. नरेंद्र भदाणे यांचा सन्मान डॉ. भामरे यांच्या हस्ते झाला. तसेच कृषि विज्ञान केंद्र, धुळे आयोजित प्रशिक्षणे यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या मेळाव्याच्या तांत्रिक सत्रामध्ये डॉ. मुरलीधर महाजन यांनी एकात्मिक कापुस लागवड तंत्रज्ञान आणि प्रा. श्रीधर देसले यांनी भाजीपाला लागवड तंत्रज्ञान या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जगदीश काथेपुरी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. धनराज चौधरी यांनी मानले.

## कृषि तंत्रज्ञान पारायण

### अहमदनगर जिल्ह्यात कृषि तंत्रज्ञान पारायणास सुरुवात

**दि. २४ ते २५ मे, २०२२.** शेतीचे उत्पन्न दुप्पट करायचे असेल तर पहिले सूत्र योग्य तंत्रज्ञान आणि वाण वापरुन उत्पादनात वाढ करणे यामुळे तेहतीस टक्के उत्पन्न वाढेल. दुसरे सूत्र शेतीतील अनावश्यक खर्च कमी करावे यामुळे तेहतीस टक्के उत्पन्न वाढेल आणि तिसरे सूत्र स्वतःची विपणन व्यवस्था निर्माण करावी यामुळे तेहतीस टक्के उत्पन्न वाढेल. या त्रिसूत्रीचा उपयोग केला तर उत्पन्न दुप्पट होण्यास मदत होईल. शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत विपणनाची साखळी निर्माण करावी यामुळे गावातील पैसा गावातच राहिल व शहरातील पैसा गावात येईल असे प्रतिपादन संचालक संशोधन व विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त






विद्यमाने तांभेरे ता. राहुरी येथे दोन दिवसीय कृषि तंत्रज्ञान पारायणाच्या उद्‌घाटन प्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. गडाख बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. शिवाजीराव जगताप उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीत तांभेरे गावचे सरपंत्र श्री. नितीन गागरे, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे, तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे प्रमुख डॉ. दत्तात्रय पाचारणे, शास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे, डॉ. अशोक वाळुंज, डॉ. प्रकाश मोरे, मंडल अधिकारी श्री. राहुल ढगे, तांभेरे सोसायटीचे चेअरमन श्री. श्रीकांत मुसमाडे, मेजर ताराचंद गागरे उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शन करतांना श्री. शिवाजीराव जगताप म्हणाले गावाने ग्राम विकास समिती स्थापन करावी व या समितीद्वारे गावाचा विकास आराखडा तयार करावा. ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. कोव्हीड–१९ काळात बरेच व्यवसाय बंद पडले परंतु शेती व्यवसाय हा अविरत सुरु राहिला व त्याने देशाची अर्थव्यवस्था सावरली. पहिल्या दिवशीच्या कृषि तंत्रज्ञान पारायणाच्या तांत्रिक सत्रात डाळिंब पिकांवर शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये डाळिंब पीक लागवडीसाठी जमिनीची निवड व निगा यावर डॉ. अनिल दुरगुडे, डाळिंब पिकावरील किडींचे नियंत्रण या विषयावर डॉ. अशोक वाळुंज आणि डाळिंब पिकावरील रोगांचे व्यवस्थापन या विषयावर डॉ. प्रकाश मोरे यांनी मार्गदर्शन केले. शिवार फेरीमध्ये श्री. गोकुळ मुसमाडे आणि डॉ. बापूसाहेब मुसमाडे यांच्या डाळिंब बागेत शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवसाच्या तांत्रिक सत्रात खरीप हंगाम पूर्व तयारी या विषयावर डॉ. दत्तात्रय पाचारणे, कृषि विभागातील विविध योजना या विषयावर श्री. महेंद्र ठोकळे, कपाशीवरील बोंड अळी व ऊस पिकातील हुमणी अळीचे नियंत्रण या विषयावर डॉ. नंदकुमार भुते यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. दत्तात्रय पाचारणे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले. या कृषि तंत्रज्ञान पारायणास तांभेरे गावाचे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोलापूर येथे कृषि तंत्रज्ञान पारायणाचे आयोजन



**दि. २८ मे, २०२२.** बदलते वातावरण, बदलत्या शेती पध्दतीतून शेती उत्पादन वाढीसाठी यांत्रिकीकरणच हवे आहे असे प्रतिपादन सोलापूर येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय अमृतसागर यांनी केले. ते बीबीदारफळ येथे कृषि तंत्रज्ञान पारायण व शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात बोलत होते. डॉ. अमृतसागर यांनी कोरडवाहू क्षेत्रात ओलावा व्यवस्थापन तसेच पिकांसाठी वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. कृषि विद्यावेत्ता डॉ. विकास लोंढे यांनी देशात आज तेलबिया उत्पादनाची गरज असून शेतकऱ्यांनी मागणी तसेच पुरवठा करणारे उत्पादन घेतले तर फायद्याचे ठरेल असे सांगत अधिक सोयाबीन उत्पादन घेण्याचे तंत्र सांगितले. मृद सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ डॉ. डी.व्ही. इंडी यांनी जमिनीत कस टिकवून अधिक ऊस उत्पादन घेण्यासाठी काय करावे ते सांगत तूर पिकावरील किड नियंत्रण समजावून सांगितले. कृषि उपसंचालक राजकुमार मोरे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुहास उपाध्ये यांनी कृषि योजनांची माहिती सांगितली. कार्यक्रमास तालुका दक्षता समिती सदस्य शिवाजी पाटील, सोसायटी व्हाईस चेअरमन नारायण साबळे व शेतकरी उपस्थित होते.

## कोल्हापूर कृषि महाविद्यालयातर्फे कृषि तंत्रज्ञान पारायणाचे आयोजन






**दि. १८ मे, २०२२.** राजश्री छत्रपती शाहु महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर अंतर्गत विभागीय विस्तार केंद्र व कृषि विभाग, आत्मा, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि तंत्रज्ञान पारायण अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

मौजे किसरुळ या ठिकाणी आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमात डॉ. अभय बागडे यांनी एकात्मिक किड व्यवस्थापन, डॉ. शैलेश कांबळे व डॉ. संभाजी जाधव यांनी पशुसंवर्धन चारा व्यवस्थापन व मुरघास तंत्रज्ञान या विषयी माहिती दिली. सकाळच्या सत्रामध्ये डॉ. योगेश बन यांनी एकात्मिक नाचणी पीक व्यवस्थापन, डॉ. शैलेश कुंभार यांनी भात पीक व्यवस्थापन व उन्हाळी नाचणी पीक प्रक्षेत्र भेटीमध्ये सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम होले यांनी सहभागी शेतकरी बांधवांना माहिती दिली. विस्तार कृषि विद्यावेत्ता डॉ. अशोक पिसाळ यांनी ऊस पीक व्यवस्थापन या विषयी माहिती दिली. सदरचा कार्यक्रम आयोजीत करण्यासाठी गावातील राज्यशासनाने कृषिभुषण पुरस्काराने गौरविण्यात आलेले मंचाचे सदस्य श्री. सर्जेराव पाटील यांनी सहकार्य केले.

## निफाड कृषि संशोधन केंद्राद्वारे कृषि तंत्रज्ञान पारायण कार्यक्रमाचे आयोजन






**दि. २७ मे, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले कृषि संशोधन केंद्र (कुंदेवाडी), निफाड व कृषि विभाग यांचे संयुक्त विद्यमाने कृषि तंत्रज्ञान पारायण कार्यक्रम मौजे तळवाडे, ता. निफाड येथे संपन्न झाला. या प्रसंगी शेतकऱ्यांनी कृषि तंत्रज्ञानाचा वापर करुन तसेच लागवड खर्च कमी करुन उत्पन्न वाढवावे असे आवाहन गहू विशेषज्ञ डॉ. सुरेश दोडके यांनी केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन तळवाडे गावचे सरपंच श्री. राजेश सांगळे हे उपस्थित होते. या शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. योगेश पाटील यांनी माती परिक्षण व खत व्यवस्थापन, डॉ. भानुदास गमे यांनी खरीप हंगामातील पिकांसाठी बिजप्रक्रिया व जिवाणू खतांचा वापर, डॉ. बबनराव इल्हे यांनी टोमॅटो, कोबी व कांदा पिकातील एकात्मिक रोग व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. निलेश मगर यांनी मका लागवड तंत्रज्ञान, प्रा. संजय चितोडकर यांनी सोयाबीन लागवड तंत्रज्ञान व डॉ. राकेश सोनवणे यांनी टोमॅटो, कोबी व कांदा लागवड तंत्रज्ञान या विषयावर तर प्रा. भालचंद्र म्हस्के यांनी खरीप हंगामातील पिकांवरील एकात्मिक किड व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. तालुका कृषि अधिकारी श्री. भटु पाटील यांनी महाराष्ट्र शासनाच्या शेतकऱ्यांसाठी विविध योजना या विषयावर उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक जिल्हा विस्तार केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. बबनराव इल्हे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगेश पाटील यांनी तर आभार प्रा. भालचंद्र म्हस्के यांनी मानले. या कृषि तंत्रज्ञान पारायणास तळवाडे गावाचे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्ष :२, अंक क्रं. : १७, मे, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## नंदुरबार जिल्ह्यात कृषि पारायण संपन्न



**दि. १९ मे, २०२२.** रोजी विभागीय विस्तार केंद्र धुळे, कृषि महाविद्यालय, धुळे आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने कृषि पारायण अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यात नवापुर तालुक्यातील धनराट या गावात दोन दिवसीय शेतकरी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या कृषि पारायण या संकल्पनेतील उपक्रमांतर्गत विभागीय विस्तार केंद्राद्वारे धनराट या गावाची निवड करण्यात आली आहे. याचाच एक भाग म्हणून धनराट गावात शेतकऱ्यासाठी खरीप हंगाम पूर्व पिकांची लागवड तंत्रज्ञान हे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष असलेले कृषि महाविद्यालय धुळेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.चिंतामणी देवकर म्हणाले विभागीय विस्तार केंद्र, कृषि महाविद्यालय आणि कृषि विद्यापीठ शेतकऱ्यांसाठी सातत्याने प्रयत्नशील असून शेतकऱ्यांनी देखील उपलब्ध तंत्रज्ञानाचा अवलंब करून शाश्वत शेतीची वाटचाल धरली पाहिजे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, नंदुरबार डॉ. साताप्पा खरबडे यांनी खरीप हंगामातील प्रमुख किडी आणि त्यांचे व्यवस्थापन याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून विभागीय विस्तार केंद्राच्या विविध उपक्रमांबाबत समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजक आणि कृषि विस्तार विद्यावेत्ता डॉ. एम.एस. महाजन यांनी खरीप हंगामपूर्व पिकांची तयारी आणि भात, मका सोयाबीन लागवड, विषय तज्ञ प्रा.श्रीधर देसले यांनी खरीप हंगामातील कांदा आणि खरीप भाजीपाला लागवड पूर्वतयारी, डॉ. पांडुरंग शेंडगे यांनी शेतीचे अर्थशास्त्र, कृषि विज्ञान केंद्राचे डॉ. राजेंद्र दहातोंडे यांनी भात व तुर प्रक्रिया उद्योग आणि तालुका कृषि अधिकारी, नवापूर श्री. बापू गावित यांनी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी तंत्र अधिकारी डॉ.संदीप पाटील,नवापुर तालुक्यातील कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक, प्रगतिशील शेतकरी श्री. रशीद गावित, श्री देवराम गावित, श्री. प्रकाश गावित आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कृषि सहाय्यक श्री. प्रशांत गांगुर्डे यांनी केले.

## जागतिक मधमाशी दिन साजरा

**दि. २० मे, २०२२.** मधमाशी हा निसर्गातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. मधमाशी अविरतपणे करत असलेल्या परागीभवनाच्या कामामुळे अन्नधान्याबरोबरच शेतातील प्रत्येक पिकांच्या उत्पादन क्षमतेत ३० ते ४० टक्के वाढ होते, ही बाब संशोधनाने सिद्ध झाली आहे. भारतीय शेती व शेतकरी यांच्यासमोर उत्पादनवाढीच्या समस्या भेडसावत असताना परागीकरण करून पिकातील उत्पादन वाढीसाठी मदत करणाऱ्या मधमाशी या घटकाला विसरून चालणार नाही. यासाठी तिचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी



केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि कीटकशास्त्र विभाग व हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र कास्ट प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मधमाशी दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. शरद गडाख बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ व या कार्यक्रमासाठी व्याख्याते म्हणून लातूर येथील पाटील मधमाशीपालन केंद्राचे संचालक डॉ. दिनकर पाटील, महाबळेश्वर येथील खादी ग्रामोद्योग मंडळाचे संचालक डॉ. दिग्विजय पाटील तसेच कृषि कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी. एस. पाटील, कास्ट प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे या वेळी उपस्थित होते.

डॉ. दिनकर पाटील यावेळी म्हणाले की राज्यातील चारही कृषि विद्यापीठे तसेच कृषि विज्ञान केंद्रे यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे क्लस्टर ग्रुप तयार करून वेगवेगळ्या पिकांची माहिती जर वेळेवर मधपालकांना दिली तर परिसरातील मधपालकांना आर्थिक फायदा होईल. शेतकऱ्यांनी उत्पादनवाढीसाठी कितीही प्रयत्न केले तरी पीक फुलोरा अवस्थेत असताना शेतात मधमाशा नसतील तर अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. या करिता शेतकऱ्यांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. यावेळी दुसरे व्याख्याते डॉ. दिग्विजय पाटील मार्गदर्शन करताना म्हणाले की मधमाशी पालन व्यवसायाची वृद्धी करण्यासाठी संपूर्ण राज्यात एकात्मिक मधमाशीपालन व मध केंद्र योजना सुरु करण्यात आलेली आहेत. त्याचबरोबर राष्ट्रीय फलोत्पादन योजनेद्वारे स्फूर्ती योजना कृषि विभागाच्या पोकरातर्फे मधमाशी पालनाच्या योजना सुरू केलेल्या आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. प्रमोद रसाळ यांनी मधमाशांचे महत्व, त्यांचं शेतीमधील अन्नधान्य वाढण्यातील योगदान तसेच त्यांच्या विषयीची कृतज्ञता म्हणून हा दिवस जागतिक पातळीवर साजरा होत असल्याबद्दल मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सी. एस. पाटील यांनी केले. डॉ. मुकुंद शिंदे यांनी कास्ट प्रकल्पाने आतापर्यंत केलेल्या कामाची तसेच मधमाशाविषयीच्या प्रशिक्षणाची माहिती दिली. या कार्यक्रमाचे संयोजक म्हणून डॉ. सी. एस. पाटील व डॉ. सुनील गोरंटीवार यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप लांडगे यांनी केले तर आभार डॉ. संतोष कुलकर्णी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून डॉ. संदीप लांडगे व डॉ. आर. बी. कडू यांनी काम पाहिले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील सर्व सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, विद्यार्थी तसेच शेतकरी ऑनलाइन उपस्थित होते.

## आय.ए.एस. अधिकाऱ्यांचे विद्यापीठात प्रशिक्षण संपन्न

**दि. १८ ते २० मे, २०२२.** महाराष्ट्राचे १६ ते १७ टक्के क्षेत्र सिंचनाखाली असूनही अन्नधान्य तसेच फळांच्या उत्पादनात राज्य देशात अग्रेसर आहे. याचे कारण म्हणजे कृषि विद्यापीठांनी विविध पिकातील संशोधित केलेले वाण हे होय. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा झाला असून त्यांचे उत्पन्न वाढण्याबरोबरच राज्यालाही फायदा झाला आहे. शेतकऱ्यांनी पिकविलेल्या मालाचे विपणन ही मोठी समस्या आहे. शेती उत्पादनाला मूल्यवर्धनाची जोड दिल्यास नक्कीच उत्पन्नात वाढ होऊ शकते त्यासाठी कृषि विषयक धोरण ठरविताना शेतकरी केंद्रस्थानी असावा असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. पुणे येथील यशदा संस्थेच्या वतीने प्रोबेशनरी आयएएस अधिकाऱ्यांच्या तुकडीचे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे

वर्ष :२, अंक क्रं. : १७, मे, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी




तीन दिवसांच्या प्रशिक्षण वर्गासाठी आगमन झाले होते. या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. पाटील बोलत होते. या अधिकाऱ्यांनी या तीन दिवसांच्या दौऱ्यात महात्मा फुले कृषि विद्यापीठातील विविध प्रकल्पांना भेटी देऊन माहिती घेतली. विद्यापीठाचे संशोधन, शिक्षण तसेच विस्तार कार्याचा आढावा संशोधन आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख व अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी सादर केला. विद्यापीठातील सहयोगी अधिष्ठाता व सर्व विभाग प्रमुख यांच्याशी प्रोबेशनरी आयएएस अधिकाऱ्यांच्या चर्चासत्र प्रसंगी कास्ट प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सुनील गोरंटीवार यांनी हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र काष्ट प्रकल्प व ड्रोन तंत्रज्ञान, बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेचे प्रमुख डॉ. विजय शेलार यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बौद्धिक संपदेची सद्यस्थिती आणि भविष्यातील आव्हाने या विषयावर तर प्रशासन विभागातील उपकुलसचिव श्री. व्ही. टी. पाटील यांनी कृषि विद्यापीठाच्या स्टॅट्युट संबंधी माहिती दिली. या अधिकाऱ्यांचे विद्यापीठ भेटीचे व प्रशिक्षणाचे संपूर्ण नियोजन प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे यांनी केले.

## मका पिकाच्या उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञानाची जोड हवी




**दि. ३१ मे, २०२२.** महाराष्ट्र राज्यामध्ये मका पिकाखाली सुमारे १२ लाख हेक्टर क्षेत्र असुन उत्पादकता ही ३ टन प्रति हेक्टर इतकी आहे. जागतिक पातळीवर मका उत्पादकता सरासरी ५ टन आहे. उत्पादकेतमधील हे अंतर कमी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य तंत्रज्ञानाची जोड हवी असे प्रतिपादन संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था

(वनामती), नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत मका पिकाचे प्रशिक्षकांचे प्रशिक्षण या तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरुन डॉ. गडाख बोलत होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलीक, वनामती नागपूरचे प्रशिक्षण समन्वयक श्रीमती सीमा मुंडले, रामेती नाशिकचे सहाय्यक संचालक श्री. शिलानाथ पवार, कडधान्य प्रकल्पाचे प्रमुख डॉ. नंदकुमार कुटे, मका पैदासकार डॉ. सोमनाथ धोंडे, विद्यापीठाचे शास्त्रज्ञ आणि महाराष्ट्रातून आलेले कृषि विभागाचे कृषि अधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ. प्रमोद रसाळ म्हणाले की या तीन दिवसीय प्रशिक्षणात आपण जे काही मका पीक उत्पादन तंत्रज्ञान आत्मसात केले आहे ते तंत्रज्ञान प्रभाविपणे शेतकऱ्यांपर्यंत पाहचावे. सदर प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये बियाणे निवड, जमीन मशागत, माती व पाणी व्यवस्थापन, तण, किड व रोग व्यवस्थापन तसेच प्रक्रिया व मुल्यवर्धन आणि विपणन या विषयी शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. विजू अमोलीक यांनी केले. सूत्रसंचालन श्री. शिलानाथ पवार यांनी तर आभार श्रीमती सीमा मुंडले यांनी मानले.

## पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



**दि. ३१ मे, २०२२.** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या जाहीर झालेल्या निकालांमध्ये मुलींचा वाटा मोठा आहे. मुलींना सन्मान देण्याचं मोठं काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या बारवा या उत्कृष्ट स्थापत्यकलेचा नमुना आहेत. त्यांनी शेतकऱ्यांचा शेतसारा कमी केला. महाविद्यालयाच्या व विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घालण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या अहमदनगर येथील ॲडव्होकेट सौ. शुभदा कुबडे उपस्थित होत्या. सौ. कुबडे मार्गदर्शन करतांना म्हणाल्या मुलींमधील लिंगभेद समाजामधून नष्ट झाला पाहिजे. याची जबाबदारी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर आहे. विद्यार्थी जीवनामध्ये कायद्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी समाजासाठी कोणकोणत्या जबाबदाऱ्या पार पाडले पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. प्रेरणा भोसले यांनी करून दिली. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ. मनोज गुड यांनी मानले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे फळे आणि भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण संपन्न




**दि.१८ ते २० मे, २०२२.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे फळे आणि भाजीपाला प्रक्रिया उद्योग या विषयावरिल तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग उन्नयन योजनेअंतर्गत क्षमता बांधणी घटकांतर्गत सदर प्रशिक्षणाचे आयोजन कृषि विज्ञान केंद्र, धुळे असेच कृषि विभाग धुळे यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. उद्घाटन प्रसंगी कृषि महाविद्यालय, धुळेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर हे अध्यक्ष होते. ते म्हणाले की धुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये असंघटीत स्वरुपातील सुक्ष्म तसेच गृह पातळीवरील अनेक अन्नप्रक्रिया उद्योग आहेत. त्यात प्रामुख्याने पापड उद्योग, शेवया, कुरडई, केळी वेफर्स तसेच दूध प्रक्रिया उद्योग, मसाले इ. चा समावेश होतो. अनेक महिला बचतगट अशा प्रकारच्या उद्योगांमध्ये सक्रिय असून त्यांना आर्थिक तसेच तांत्रिक पाठबळ देण्यासाठी सदर प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजनेचा प्रमुख उद्देश आहे. तांत्रिक सत्रांमध्ये कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनेश नांद्रे, विषय विशेषज्ञ श्रीमती. अम्रिता राऊत, श्री. रोहित कडु तसेच डॉ. धनराज चौधरी यांनी फळे आणि भाजीपाला प्रक्रिया तसेच उद्योजक्ताविषयी सखोल मार्गदर्शन केले. तीन दिवसाच्या या प्रशिक्षणास ३० प्रशिक्षणार्थींना प्रवेश होता. सदर प्रशिक्षणार्थी हे धुळे जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातून आले होते.

## नमामि गंगे प्रकल्प अधिकाऱ्यांची पुणे कृषि महाविद्यालयाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण प्रकल्पास भेट




**दि. ९ मे, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व नमामि गंगे प्रकल्प यांचे दरम्यान होऊ घातलेल्या सामंजस्य

कराराचे पार्श्वभूमीवर नमामि गंगे प्रकल्पाचे श्री. अशोक कुमार, महासंचालक, नमामि गंगे तथा अतिरिक्त सचिव, जल संसाधन मंत्रालय, भारत सरकार, श्री. सचिन्द्रप्रताप सिंह, आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, डॉ. विनोद तारे, प्राध्यापक तथा प्रमुख, गंगा नदी खोरे व्यवस्थापन अभ्यास केंद्र, आय.आय.टी., कानपूर, श्री. अहुजा, समन्वयक, स्वच्छ गंगा प्रकल्प, श्री. भारत भोजने, उपाध्यक्ष, एकलॅन्ड वेस्ट कंपनी, कॅलीफोर्निया इत्यादी मान्यवरांनी पुणे कृषि महाविद्यालयाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण प्रकल्पास भेट दिली. या प्रसंगी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर, विद्यापीठाच्या हवामान आधारीत शेती व पाणी व्यवस्थापन केंद्र, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सुनील गोरंटीवार, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. धीरज कंखरे, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सोमनाथ माने उपस्थित होते.

## नमामि गंगे प्रकल्प अधिकाऱ्यांची पुणे कृषि महाविद्यालयाच्या हरितगृह प्रकल्पास भेट




**दि. ०९ मे, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व नमामि गंगे प्रकल्प यांचे दरम्यान होऊ घातलेल्या सामंजस्य कराराच्या पार्श्वभूमीवर नमामि गंगे प्रकल्पाचे श्री. अशोक कुमार, महासंचालक, नमामि गंगे तथा अतिरिक्त सचिव, जल संसाधन मंत्रालय, भारत सरकार, डॉ. विनोद तारे, प्राध्यापक तथा प्रमुख, गंगा नदी खोरे व्यवस्थापन अभ्यास केंद्र, आय. आय. टी., कानपूर, श्री. अहुजा, समन्वयक, स्वच्छ गंगा प्रकल्प, श्री. भारत भोजने, उपाध्यक्ष, एकलॅन्ड वेस्ट कंपनी, कॅलीफोर्निया इत्यादी मान्यवरांनी पुणे कृषि महाविद्यालयाच्या उच्च तंत्रज्ञान पुष्प व भाजीपाला प्रकल्पास भेट दिली. या प्रसंगी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर, विद्यापीठाच्या हवामान आधारीत शेती व पाणी व्यवस्थापन केंद्र, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सुनील गोरंटीवार, उच्च तंत्रज्ञान पुष्प व भाजीपाला प्रकल्पाचे व्यवस्थापक डॉ. सचिन चव्हाण उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

**दि. १ मे, २०२२.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी धुळे कृषी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. प्रवीणकुमार पाटील हे प्रमुख पाहुणे तर सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे श्री. पाटील म्हणाले विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे कष्ट करण्याबरोबरच नेहमी दैनंदिन जीवनात सकारात्मक दृष्टिकोण अंगीकारला पाहिजे. सकारात्मक व्यक्ती स्वतः बरोबर समाज आणि संपूर्ण मानवीजीवनाचा उद्धार करू शकतो. डॉ. देवकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना ईर्ष




विद्यार्थ्यांनी देखील आपले प्रयत्नात सातत्य राखून यशस्वी होण्याकरता अहोरात्र प्रयत्न केले पाहिजेत असा संदेश दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सोमनाथ सोनवणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यार्थी परिषद – विद्यार्थी सभापती नितीन काटे याने कृषि महाविद्यालय आणि विद्यार्थी परिषदेचा अहवाल सादर केला तर क्रीडा सचिव शुभम पाटील या विद्यार्थ्याने महाविद्यालयाचा क्रीडा अहवाल सादर केला. मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना प्रशस्तीपत्रके, सन्मानचिन्हे आणि पदके सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली. जयेश जाधव आणि उदय अहिरे या विद्यार्थ्यांना अनुक्रमे २०२०–२१ आणि २०२१–२२ या शैक्षणिक वर्षांचा उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास कृषि महाविद्यालयातील विभाग प्रमुख डॉ. एस. पी. सोनवणे, डॉ. सी. व्ही. पुजारी, डॉ. पांडुरंग शेंडगे, डॉ. टी. डी. पाटील, डॉ. जी. बी. काबरे, डॉ. संदीप पाटील, प्रा. विपुल वसावे, विस्तार कृषि विद्या वेत्ता डॉ. एम.एस. महाजन, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.जितेंद्र सूर्यवंशी, क्रीडा अधिकारी प्रा. कुलदीप पाटील तसेच कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिषेक वाघ आणि सोनाली नरवणे या विद्यार्थ्यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.कुलदीप पाटील यांनी केले.

## धुळे कृषि महाविद्यालयात ग्रामीण कृषि कार्यानुभवच्या विद्यार्थ्यांचा ओरिएन्टेशन कार्यक्रम संपन्न




**दि. २६ मे, २०२२.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे कृषि पदवीच्या सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांसाठी ओरिएन्टेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर हे होते. कृषि पदवीच्या

सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनाचा व कृषिचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा यासाठी कृषि पदवी अभ्यासक्रमामध्ये ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमाचा समावेश करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये विद्यार्थ्याना या जून महिन्यापासून एकूण तीन मुख्य केंद्र अनुक्रमे शिरपुर, देऊर, म्हसदी देण्यात आलेली आहेत. या केंद्रांतर्गत एकूण १३ गावे आहेत व एकूण ७८ विद्यार्थी आहेत. या गावांमध्ये विद्यार्थी प्रत्यक्ष राहतील व ग्रामीण जीवनाचा व कृषिचा प्रत्यक्ष अनुभव घेतील. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. देवकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना कृषि कार्यानुभव कार्यक्रमाबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. संदिप पाटील, कृषि कार्यानुभव कार्यक्रम समन्वयक तथा प्राध्यापक, कृषि विस्तार व संप्रेषण विभाग यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व विद्यार्थ्यांना कृषि कार्यानुभव कार्यक्रम कसा राबविण्यात येणार आहे याबाबत सादरीकरण केले. तसेच यावेळी प्राध्यापक डॉ. एस. पी. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना सदर कार्यक्रमाबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास कृषि महाविद्यालयातील विभाग प्रमुख, विषय तज्ञ विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. बी. भिंगारदे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. एस. एच. बन, कनिष्ठ संशोधन सहाय्यक यांनी केले.

## हिंसाचार व दहशतवाद विरोधी दिनाचे आयोजन



**दि. २३ मे, २०२२.** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे भारतीय लोकशाही जगातील उत्तम लोकशाही आहे. परंतु काही समाजकंटक लोक आपल्या स्वार्थासाठी देशामध्ये हिंसाचार घडवून आणतात व अशा लोकांमुळे देशातील सुसंस्कृत नागरिकांचे जीवन अडचणीत येते. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन सुजान नागरिक बनावे व देशातील अशा समाजकंटक लोकांच्या अनिष्ट प्रवृत्तींना आळा घालावा. शिक्षणाशिवाय हिंसाचार व दहशतवादाचा मुकाबला करणे शक्य नाही असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. तानाजी नरोटे यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय आयोजित हिंसाचार व दहशतवाद विरोधी दिवस पाळण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. नरोटे बोलत होते. याप्रसंगी हिंसाचार व दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे नोडल अधिकारी डॉ. मनोज गुड यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी संस्कृती सणस, समीक्षा आव्हाळे व दिलीप कहांडोळे त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
मे २०२२

## जून महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- बीटी कापूस लागवडीनंतर ३० दिवसानी नत्र खताचा दुसरा हप्ता (५० किलो नत्र प्रति हेक्टर) देवून पाणी द्यावे.
- बिगर बीटी कापूस लागवडीनंतर ३० दिवसांनी नत्र खताचा दुसरा हप्ता (४० किलो नत्र प्रति हेक्टर) देवून पाणी द्यावे.
- मावा, तुडतुडे इत्यादी रस शोषणाऱ्या किडीचा अधिक नुकसान पातळीपेक्षा जास्त प्रादुर्भाव दिसून आल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. लेडीबर्ड बिटल, क्रायसोपा या सारख्या मित्र किडींचे संवर्धन करावे.
- बीटी कपाशीमध्ये गुलाबी बोंड अळीच्या सर्वेक्षणासाठी शेतात हेक्टरी ५ कामगंध सापळे उभारावेत व त्यातील पेक्टीनो ल्यूर दर २१ दिवसांनी बदलावे.
- शेतामध्ये तण दिसून आल्यास ३० ते ३५ दिवसांनी एक खुरपणी करावी.

### ऊस

- आडसाली उसाच्या लागणपूर्व तयारीच्या दृष्टीने जमिनीची निवड, पूर्व मशागत, रान बांधणी, ऊस जाती, बेणे उपलब्धता सेंद्रीय आणि रासायनिक खत पुरवठा, तणनाशके व आंतरपिके याबाबत मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव येथील शास्त्रज्ञांनी सल्ला मसलत करुन यासाठी तजवीज करुन ठेवावी.
- पूर्वहंगामी आणि आडसाली ऊस जोदार वाढीच्या अवस्थेत असून, जमिनीतील ओल, पाऊसमान पाहून उपलब्धतेनुसार नियमित पाणी पुरवठा करावा.
- उशीरा लागण झालेल्या सुरु उसास मोठया बांधणीच्या वेळी १०० किलो नत्र (२१७ किला युरिया), ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) अशी प्रती हेक्टरी रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
- उसास युरियाची मात्रा देताना निंबोळी पेंडीची बारीक भुकटी एक किलो व सहा किलो युरिया असे प्रमाण ठेवावे.
- खोडवा उसास (खोडवा ठेवल्यानंतर १३५ दिवसांनी) पहारीच्या सहाय्याने खतांचा दूसरा हप्ता म्हणजेच १२५ किलो नत्र (२७२ किलो युरिया), ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) अशी प्रति हेक्टरी रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
- पट्टा पध्दत आणि सूक्ष्म जलसिंचन पध्दत यांचा अवलंब केल्यास उसावरील पाण्याचा ताण कमी करता येईल.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास २१ ते २६ आठवड्यांपर्यंतच्या सुरू व खोडवा उसाला वाढीच्या अवस्थेनुसार एकरी ४ किलो पांढरे म्युरेट ऑफ पोटॅश प्रति आठवडा ठिबक सिंचन प्रणाली मधून द्यावीत.
- हुणीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी रात्रीच्या वेळी कडुलिंब, बोर, बाभूळ या झाडांवर जमा होणारे हुमणीचे भुंगेरे गोळा करुन रॉकेलमिश्रीत पाण्यात टाकून त्यांचा नाश करावा. हा उपक्रम सामुदायिकरित्या २-३ वेळा करावा.
- कांडीकिडीचा प्रादुर्भाव असल्यास ट्रायकोग्रामा चिलोनिस या परोपजीवी मित्रकिटकाचे ५ ते ६ ट्रायकोगार्ड प्रति हेक्टरी वापरावेत.

### कडधान्य पिके

#### मूग आणि उडिद

- दुसऱ्या पंधरवाड्यात चांगला पाऊस झाल्यावर वापश्यावर बीजप्रकिया करुन पेरणी करावी. (प्रति किलो बियाणास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा व यानंतर २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणूसंवर्धक).

- शिफारशीत ख़त मात्रा ( २० :४० :००/हेक्टर ) पेरणीवेळी द्यावी.

**तूर**

- दुसऱ्या पंधरवाड्यात चांगला पाऊस झाल्यावर बीजप्रकिया (२ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम बाविस्टीन किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा / किलो बियाणे व यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम जीवाणूसंवर्धक/ १० किलो बियाणे) करुन वापश्यावर पेरणी करावी. शक्यतो ७ जून ते ७ जुलै पर्यंत पेरणी करावी.
- शिफारशीत ख़त मात्रा पेरणीवेळी द्यावी.
- तणनाशकाचा वापर करावयाचा असल्यास पेरणीनंतर लगेच पुरेसा ओलावा असताना उगवणीपूर्व तणनाशक पेंडिमेथॉलीन फवारावे.
- पेरणीनंतर १० दिवसांनी नांग्या भराव्यात.

**भात**

रोपवाटीका नियोजन

अ) सुधारीत जाती

- ब) संकरीत जातीसाठी प्रति हेक्टरी २० किलो बियाणे वापरावे
- बिजप्रक्रिया पेरणीपूर्वी बियाणास २.५ ग्रॅम प्रति किलोग्रॅम याप्रमाणे कार्बे न्डाझिम किंवा थायरम/कॅप्टन बुरशीनाशक चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर, स्फुरद विरघळणारे जीवाणू व ॲझोस्पिरीलिअम या जीवाणू खतांची २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रीया करावी.
- पेरणी कालावधी व पेरणी अंतर
- अ) पुर्नलागवड भात : १ मीटर रुंदी, १५ सें.मी. उंची व सोईनुसार लांबी ठेवून गादी वाफ्यावर खरीप हंगामामध्ये १ जून ते ३० जून पर्यंत पेरणी करावी. साधारणतः १० गुंठ्याची रोपवाटीका १ हेक्टर लागवडीसाठी पुरेशी ठरते. रोपवाटीकेसाठी २५० ग्रॅम शेणखत, ५०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ५०० ग्रॅम पालाश प्रति गुंठा द्यावे. पेरणी ओळीत करावी. पेरणीनंतर १५ दिवसांनी ५०० ग्रॅम नत्र प्रति गुंठा रोपे वाढीसाठी द्यावे.
- ब) पेरभात : भात बियाणे २२.५ किंवा ३० सें.मी. अंतर ठेवून पेरणी करावी.
- क) टोकण पद्धत : भात बियाणे ३० द १५ सें.मी. किंवा २२.५ द २२.५ सें.मी. अंतरावर टोकण करावे.

**तण नियंत्रण**

- रोपवाटीका : रोपवाटीकेतील तण नियंत्रणासाठी १५ मि.ली. ऑक्झीफ्लुरोफेन २३.५ टक्के ई.सी. प्रती १० लिटर पाण्यात पेरणीनंतर दोन ते तीन दिवसात फवारावे अथवा ब्युटाक्लोर ५० ई.सी. १.५ किलो क्रियाशील घटक प्रती हेक्टरी अथवा ॲनिलोगोर्ड ३० ई.सी. ३ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी फवारण्यात यावे.

**नाचणी**

- रोपवाटीका गादीवाफा साधारणतः १ ते १.५ मी. रुंद आणि ८ ते १० सें.मी. उंच व उतारानुसार लांबी ठेवून गादीवाफे जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तयार करावेत. दर चौ.मी. क्षेत्रावर ३ किलो याप्रमाणे शेणखताचा थर द्यावा. आणि प्रति गुंठ्यास १ किलो युरिया द्यावा. ७ ते ८ सें.मी. अंतरावर ओळीत १ ते २ सें.मी. खोल बियाणे पेरून हाताने झाकावे.

पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा १ किलो युरिया द्यावा. एक एकर क्षेत्र रोप पुनर्लागणीकरीता २– ३ गुंठे क्षेत्रावरील रोपवाटीका पुरेशी होते.

- सुधारीत वाण : फुले नाचणी, दापोली–१, दापोली सफेद, दापोली–२, फुले कासारी

### बाजरी

- शिफारशीप्रमाणे रासायनिक खताची मात्रा देऊन तसेच जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करून पिकाच्या अंतरानुसार पेरणी करावी. ॲट्राझीन तणनाशकाची १.० कि.प्रती हेक्टरी पेरणीनंतर ५०० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. पेरणी नंतर १० दिवसांनी व २० दिवसांनी विरळणी करावी.

### सोयाबीन

- पेरणीच्या वेळी बिजप्रक्रिया करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रती १० कि.बियाणासाठी थायरम ३७.५% + कार्बोक्सिन ३७.५% ३० ग्रॅम बियाणास चोळावे.त्यानंतर प्रती १०कि. बियाणासाठी थायमिथोक्जाम ३० एफ एस ६० मिली आणि शेवटी २५० ग्रॅम रायझोबियम व २५० ग्रॅम पी एस बी बियाणास चोळावे. यामुळे मातीतून आणि बियाणाद्वारे प्रसारीत होणाऱ्या रोगांपासून संरक्षण होते आणि पिवळा मोझॅकरोगाचा प्रसार थांबतो तसेच खोडमाशी व रसशोषक किडींपासून संरक्षण होते. शिवाय, पिकास नत्र व स्फुरदची उपलब्धता होते.
- पेरणीनंतर १५ ते २० दिवस या कालावधित :
- अ. तणनियंत्रणासाठी शिफारस केलेल्या तणनाशकाचा वापर करावा.
- ब. खोडमाशीच्या नियंत्रणासाठी बिजप्रक्रिया केली नसल्यास क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५% २० मिली प्रती १० ली. पाण्यातून फवारावे. या फवारणीमुळे पाने खाणाऱ्या अळ्यांपासून संरक्षण होते.

### रब्बी ज्वारी

- कुळवाच्या सहाय्याने २ ते ३ पाळ्या द्याव्यात, तिसऱ्या पाळीपूर्वी ७ ते १० टन शेणखत पसरावे.

### फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब –पावसाचे अतिरिक्त पाणी काढुन द्यावे. पिकसंरक्षणार्थ फळे पोखरणारी अळी, रस शोषणाऱ्या किडी व पानावरील ठिपके नियंत्रण करावे.
- सिताफळ – मशागतीची कामे करावीत.
- बोर – शिफारशीत खताच्या मात्रा द्याव्यात. नवीन फुटीवर पाने खाणारी अळी/ भुंगेरेचे नियंत्रण करावे.
- आवळा – सरंक्षित पाणी द्यावे. पाने खाणारी अळी, फुलकिडे यांचे नियंत्रण करावे.
- जांभूळ– बागेची स्वच्छता फळांची काढणी.
- कागदी लिंबू – शिफारशीत खतमात्रा (६००:३००:६०० ग्रॅम नत्रःस्फुरदःपालाश प्रति झाड प्रति वर्ष) + १५ किलो शेणखत + १५ किलो निंबोळी पेंड द्यावी. त्यापैकी ४०% नत्र व संपूर्ण स्फुरद, पालाश, शेणखत व निंबोळी पेंड द्यावी. हस्त बहाराच्या नियोजनासाठी जिब्रेलिक ॲसिड ५० पी पी एम ची फवारणी करावी. पिठ्या ढेकूण : क्लोरोपायरीफॉस

२० टक्के २० मिली / १० लि. पाण्यातून फवारावे. कोळी : डायकोफॉल २०-२५ मिली/१० लि. पाण्यातून फवारावे.

### भाजीपाला व्यवस्थापन

- उन्हाळी हंगामातील वेलवर्गीय भाजीपाला पिकांची वेळेवर काढणी करावी.
- उन्हाळी हंगामातील वांगी, टोमॅटो, मिरची पिकाची तोडणी करावी.
- किड व रोग नियंत्रणाचे उपाय करावे.
- खरीप हंगामातील भाजीपाला पीक लागवडीसाठी शेताची मशागत करावी.
- मशागतीचे वेळी शेणखताचा वापर करावा.
- खरीप हंगामात कांदा, वांगी, टोमॅटो, मिरची, भेंडी, गवार, वेलवर्गीय भाजीपाला, फ्लॉवर, कोबी इ. पिकांची लागवड करावी.
- कांदा, वांगी, मिरची, टोमॅटो, फ्लॉवर व कोबी पिकांच्या रोपवाटीकेसाठी तयार करावे. रोपे गादीवाफ्यावर तयार करावेत.
- कांदा, वांगी, मिरची, टोमॅटो, फ्लॉवर व कोबीचे रोप तयार करण्यासाठी बियांची पेरणी करावी.
- पेरणीआधी बिजप्रक्रिया करावी.
- रोपवाटीकेस सुरूवातीला झारीने पाणी द्यावे, नंतर पाटपाणी दिले तरी चालू शकते.

### आले

- १२० किलो नत्र प्रति हेक्टर यापैकी पहिला हप्ता ६० किलो नत्र लागवडीनंतर एक महिन्यांनी द्यावे.
- जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाण्याचे नियोजन करावे.
- तणनाशकांचा वापर केला नसल्यास वेळच्या वेळी येणारी तणे खुरपणी करुन काढून टाकावीत.
- जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाण्याचे नियोजन करावे.
- पावसाचे पाणी साचू देवू नये. पाण्याचा तात्काळ निचरा करावा.

### पशुसंवर्धन

- पावसाळयापुर्वी गोठा दुरुस्त करावा. छताची छिद्रे बंद करावीत. गोठया भोवती पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. गोठयात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. चिखल होवू देवू नये.
- हिरव्या चाऱ्याकरीता ज्वारी, बाजरी, मका यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याचबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथीघास यासारखी पिके घ्यावीत.
- साठविलेल्या सुक्या चाऱ्यावर पाणी पडून त्यात बुरशी लागली असेल तर असा चारा जनावरांना देऊ नये तो नष्ट करावा.
- जनावरांचे खाद्य / खाद्यघटक दमट आर्द्रता युक्त वातावरणात साठवू नयेत. त्यामध्ये भिंतीचा / जमिनीचा ओलसरपणा मुरणार नाही याची काळजी घ्यावी.

### अवजारे

- ट्रॅक्टरचलीत ज्योती बहुपिक टोकण यंत्र

- भुईमुग, सुर्यफुल, करडई, सोयाबीन, मका, गहू, वारी हरभरा, तूर इ. पिकांची टोकण पध्दतीने पेरणी करता येते.
- खतांची मात्रा शिफारशीनुसार योग्य खोलीवर आणि बियाण्याच्या बाजूला देता येते.
- शिफारशीप्रमाणे २ ओळींतील आणि दोन रोपांतील योग्य अंतर राखता येते.
- प्रत्येक फणाच्या बियाण्यांच्या पेटया वेगळया असल्यामुळे तुरीसारख्या आंतरपिकांची टोकणसुध्दा करता येते.
- हे यंत्र ३५ अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरवर चालते.
- एका दिवसात जवळजवळ ३ ते ३.५ हेक्टर क्षेत्रावर टोकण पध्दतीने पेरणी करता येते.

**प्रकाशक** : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. खेमचंद खैरनार**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र
**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४७३/२०२२**